# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३.२३०९७१० **E.Mail - pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०५/०४/२०१८

**नाशिक - त्रंबकेश्वर महामार्गावर दरोडा टाकणारे गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने केले जेरबंद**

---

दिनांक ०२ एप्रिल २०१८ रोजी मध्यरात्रीचे सुमारास चिंचवड, ता.त्रंबकेश्वर येथील रहिवासी श्री. हिरामण खेडुलकर (ड्रायव्हर) हे त्यांचे ताब्यातील मालवाहु ट्रकमध्ये जळावु लाकडे घेवुन नाशिक बाजुकडे जात असतांना नाशिक - त्रंबकेश्वर रोडवरील अंजनेरी शिवारात अज्ञात ०४ ते ०५ अज्ञात आरोपीतांनी त्यांचे ट्रकला दोन मोटर सायकली आडव्या लावुन ट्रकचे कॅबिनमध्ये चढुन ड्रायव्हर व क्लिनरला सुरा व काठीचा धाक दाखवुन त्यांचे खिशातील रोख ३३,०००/- रू. व मोबाईल फोन असा ऐवज जबरीने लुटमार करून नेला म्हणुन **त्रंबकेश्वर पोलीस ठाणेस I गुन्हा रजि.नंबर ३७/२०१८ भादवि कलम ३९५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेणेसाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाचा समांतर तपास सुरू होता.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना महामार्गावरील लुटमार करणारे आरोपींचा शोध घेणेबाबत सुचना दिल्या होत्या. दरम्यान दिनांक ०४ एप्रिल २०१८ रोजी **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांना खब-यांमार्फत मिळालेल्या गुप्त बातमीप्रमाणे वरील गुन्हा करणारे गुन्हेगार हे त्रंबकेश्वर तालुक्यातील तळवाडे गावातच असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी तळेगाव व राजेवाडी परिसरात रात्रभर सापळा रचुन संशयीत **इसम नामे १) तुषार मंगळु टोपले,** रा. राजेवाडी, ता.जि. नाशिक, **२) मयुर दत्तु बोडके,** रा. तळवाडे, ता.त्रंबकेश्वर यांना शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमांना विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी त्यांचे साथीदार नामे ३) अनिल रंगनाथ भगत, रा. मुळेगाव, ता.इगतपुरी, ४) भुषण पंढरीनाथ कसबे, रा. माळेगाव, ता.त्रंबकेश्वर, ५) काळु भंडागे, रा.गोरठाण, ता.त्रंबकेश्वर, ६) संदिप दत्तु बोडके, रा.तळवाडे, ता. त्रंबकेश्वर यांचेसह दोन दिवसांपुर्वी मध्यरात्रीचे सुमारास नाशिक त्रंबकेश्वर रोडवर एक ट्रक अडवुन त्यातील ड्रायव्हर व क्लीनर यांना सुरा व काठीचा धाक दाखवुन मारहाण करून रोख रूपये व मोबाईल असा ऐवज लुटमार केल्याची कबुली दिली आहे.

वरील आरोपी नामे तुषार मंगळु टोपले व मयुर दत्तु बोडके यांचे कब्जातुन गुन्हयात वापलेली एक बजाज डिस्कव्हर व एक टि.व्ही.एस.स्टार अशा दोन मोटर सायकल किं.रू. ३०,०००/- चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेल्या आहे. वरील आरोपीतांपैकी काही आरोपींविरूध्द यापुर्वीही जबरी लुटमारीचे गुन्हे दाखल आहे. ताब्यात घेतलेले आरोपींचे इतर साथीदारांचा स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कसोशिने शोध घेत असुन त्यांचेकडुन अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक **श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शनाखाली **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, सपोउनि रामभाउ मुंढे, चंद्रभान जाधव, पोहवा राजु दिवटे, हनुमंत महाले, पोना वसंत खांडवी, जालिंदर खराटे, पोकॉ लहु भावनाथ, कपालेश्वर ढिकले, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, संदिप लगड अशा पथकाने सहभाग घेवुन सदर गुन्हा उघडकीस आणलेला आहे.